आमचे व्यतिरिक्त अन्य कोणीही आपला मालकी हक्क हितसंबंध अगर कबजा सांगत नाही. याउपरही सदर मिळकतीवर आमचे व्यतिरिक्त अन्य कोणीही आपला मालकी हक्क, हितसंबंध अगर कबजा सांगितल्यास किंवा मिळकतीवर बोजा अगर जडजोखीम आढळून आल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे पदरखर्चाने करुन देवू. त्याबाबत तुम्हांस तोषिस लागु देणार नाही.

15) **टॅक्सेसः-** वर कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व प्रकारचे कर हे लिहून देणार यांनी आजपर्यंत भरलेले असुन वर कलम 2 मधील मिळकतीचे संपुर्ण कर कबजा मिळालेपासुन लिहून घेणार यांनी भरावयाचे आहे. तसेच कलम 2 या मिळकतीबाबत अंतिम खरेदीचे वेळी वा नंतर भविष्यात येणारे जी.एस.टी., एल.बी.टी. किंवा लागु होणारे सर्व प्रकारचे कर हे लिहून घेणार यांनी भरावयाचे अंगिकारलेले आहे व सदरचे जी.एस.टी., एल.बी.टी. लिहून घेणार यांनी लिहून देणार यांनी मागणी करताच त्यांचेकडे जमा करावयाचे आहे. आकारणी प्रमाणे जी.एस.टी., एल.बी.टी. अदा न केल्यास त्या बाबतची संपुर्ण जबाबदारी लिहून घेणार यांची राहील ही बाब लिहून घेणार यांना मान्य व कबुल आहे.

16) वर कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर भविष्यात नाशिक महानगरपालिकेने जादा एफ.एस.आय. (चटई क्षेत्र निर्देशांक) मंजूर केल्यास त्याचा वापर करणेचा व सदर एफ.एस.आय. नुसार वर कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर वाढीव बांधकाम करण्याचा हक्क लिहून देणार यांना राहील. त्याकामी लिहून घेणार हे अगर त्यांचे वालीवारस काहीएक तक्रार, वाद करणार नाही अगर हक्क अगर हरकत सांगणार नाही. तसेच कॉमन टेरेसवर लिहून देणार यांचाच संपुर्ण हक्क व अधिकार राहील. रेरा कायद्यानुसार सदरचे अतिरिक्त बांधकाम करण्यास प्रकल्पातील दोन तृत्यांश सभासदांची संमती आवश्यक आहे तरी लिहून घेणार यांनी या कराराद्वारे सदरची संमती लिहून देणार यांना दिलेली आहे व अशी संमती देणे कामी गरज भासल्यास लिहून घेणार हे जातीने हजर राहून आपली संमती देतील व त्या कामी कोणतीही हरकत उपस्थित करणार नाही.

17) लिहून देणार या कराराद्वारे जाहीर करतात की,

1. सदरील प्लॉट व बांधीव मिळकत ही बिनबोजाची आहे.

2. सदरील प्लॉट बिनशेतीकडे वर्ग करण्यात आलेला आहे.
3. सदरील प्लॅन महानगरपालिकेने मंजूर केलेला आहे.
4. सदरील प्लॉट या बांधकामा संदर्भात कोणत्याही कोर्टात आजपावेतो कोणत्याही प्रकारचे प्रोसेडींग दाखल नाही किंवा अटकाव करणारा हुकूम नाही.
5. लिहून देणार यांना अशा प्रकारे सदरची मिळकत हस्तांतरित करण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे.
6. सदरील बांधीव मिळकतीस देण्यात येणाऱ्या सुविधा कराराच्या परिशिष्ठानुसार असतील.

18) **खर्चः-** कलम 2 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे हस्तांतरणाकामी तसेच प्रस्तुतच्या करारनाम्याचा संपुर्ण खर्च जसे लिखाणावळ, नोंदणावळ, वकील फी, मुद्रांक शुल्क, नोंदणी फी इत्यादी लिहून देणार यांनी केलेला व सोसलेला आहे. तसेच कलम 2 मधील मिळकतीचे अंतिम हस्तांतरणाचा खर्च करण्याचे अंगिकारलेले आहे. सदरचे करारनाम्याचा व अंतिम हस्तांतरणाकामी येणारा खर्च लिहून घेणार यांनी लिहून देणार यांचेकडे सदरचे दस्त तयार करणेपुर्वी द्यावयाचा आहे.

19) **कागदपत्रेः-** लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना सदर करारनाम्यासोबत 7/12 उतारा, बांधकाम परवानगी, मंजूर बिल्डिंग प्लॅन, टायटल रिपोर्ट, प्रकल्प महारेरा कडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती दिलेल्या असून कम्प्लिशन सर्टिफिकेट व कबजा पावती देण्याचे मान्य केले आहे. सदरचा करारनामा लिहून घेणार यांनी सही करण्यापुर्वी वाचून व समजून घेतलेला आहे.

परिशिष्ठ ब

मिळकतीमधील सुविधा

1. इमारतीचे बांधकाम आरसीसी फ्रेम स्ट्रक्चरमध्ये असेल.
2. चांगल्या प्रतीच्या विटांचे बांधकाम व बाहेरील भिंती 6" व आतील भिंती 4" जाडीच्या असतील.
3. संपुर्ण 2 बाय 2 टाईल्स फ्लोरिंगला असून, मेन दरवाजा हा फ्लश स्वरुपात राहील.
4. टॉयलेटमध्ये 7 फुटापर्यंत ग्लेज वॉल टाईल्स असतील.

Scanned by CamScanner